FOREST DEPARTMENT GOVERNMENT OF MAHARASHTRA
STATE LEVEL COMMITTEE
(CONSTITUTED AS PER THE ORDER DATED 5/10/2015 OF THE HON'BLE SUPREME COURT OF INDIA IN WRIT PETITION NO 202/95 )

"Vanbhavn" Ist Floor,C-Wing, Ramgiri Road, Civil Line, Nagpur-440 001
Tel:0712-2556937, Email Id; slc.forest@mahaforest.gov.in

F.No. SLC/2016/C.R. No. 02(2016)/ Part-8/45 Dated - 23/05/2019

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक-सर्व)
---------------------

**विषय** :- आरागिरणीचे राखीव/संरक्षीत वनक्षेत्रापासून 10 कि. मी. चे आत स्थापीत करण्याबाबत- Advisory.

**संदर्भ**- 1. राज्य स्तरीय समितीच्या दिनांक 25/04/2019 रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत.
2. भारत सरकार, पर्यावरण, वन व जलवायु परीवर्तन, मंत्रालय, नवी दिल्ली यांची दि. 11/11/2016 व दिनांक 11/09/2017 रोजीचे दिशानिर्देश

महाराष्ट्र वन नियमावली, 2014 चे.नियम 53 (6) (ड) मध्ये खालील प्रमाणे नमूद आहे.

"सदरची आरागिरणी आधीच वनहद्दीपासून दहा कि. मी. अंतराच्या आत असल्याचा आणि असे स्थानातरण त्याच महानगरपालीका किंवा नगरपालीका यांच्या हद्दीत किंवा त्याच गावाच्या हद्दीत होत असल्याचा अपवाद वगळता, कापणी आणि आरायंत्राचे असे स्थानातरण राखीव अथवा संरक्षीत वनापासून दहा किलोमीटरच्या आत करण्यास परवानगी देता येणार नाही."

भारत सरकारच्या दिनांक 11/11/2016 व दिनांक 11/09/2017 च्या दिशानिर्देशान्वये खंड 7 (ii) (b) मध्ये खालील प्रमाणे नमुद आहे-

*"A Wood Based Industry can be established in an Industrial Estate or a Municipal area, irrespective of the aerial distance from the boundary of nearest forest or protected area"*

उपरोक्त भारत सरकारच्या दिशानिर्देशाचे अनुषंगाने राज्य स्तरीय समितीच्या दिनांक 15/12/2018 रोजी झालेल्या 12 व्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला की, या विषयी Advisory Letter सर्व मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक) यांना देण्यात यावे.

राज्यस्तरीय समितीच्या दिनांक 25/04/2019 रोजीच्या बैठकीमध्ये खालील प्रमाणे Advisory मंजूर करण्यात आलेली आहे.

"भारत सरकारने दि. 11/11/2016 व दि. 11/09/2017 रोजी जारी केलेल्या दिशानिर्देशाप्रमाणे लाकडावर आधारीत उद्योग जर औद्योगिक क्षेत्रात (राज्य शासनाने लाकडावरआधारीत उद्योगासाठी अधिसूचित केलेले क्षेत्र) किंवा महानगरपालीका किंवा नगरपालीका हद्दीच्या आत स्थापीत होत असल्यास, राखीव/ संरक्षीत वनक्षेत्रापासून 10 कि.मी. अंतराची अट लागु राहणार नाही."

उपरोक्त प्रमाणे झालेली सुधारणा सर्व अनुज्ञप्ती अधिकारी यांचे निदर्शनास आणून द्यावी.

(एस. एस. दहिवले)
वनसंरक्षक (वन विनियमन) तथा
सदस्य सचिव, राज्यस्तरीय समिती,
महाराष्ट्र राज्य

d:\committee slc\slc meeting note\slc decision.docx 7

Scanned with CamScanner